निवडक

यशस्वी जयस्वालने इंडियन प्रीमियर लीगमध्ये नोंदवला विक्रम

मुंबई, दि. २१ : यशस्वी जयस्वालने इंडियन प्रीमियर लीगमध्ये एक विक्रम नोंदवला आहे. त्याने वीरेंद्र सेहवागचा एक खास विक्रम मोडला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या आयपीएलच्या ६१व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सकडून यशस्वी जयस्वालने डावाची सुरुवात केली.

यशस्वी जयस्वालने इंडियन प्रीमियर लीगमध्ये एक विक्रम नोंदवला आहे. त्याने वीरेंद्र सेहवागचा एक खास विक्रम मोडला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या आयपीएलच्या ६१व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सकडून यशस्वी जयस्वालने डावाची सुरुवात केली.

चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या सामन्यात सलामीला आलेल्या यशस्वी जयस्वालने पहिल्याच चेंडूवर चौकार मारला. या चौकारासह यशस्वी जयस्वालने आयपीएल इतिहासात पहिल्याच चेंडूवर सर्वाधिक चौकार मारण्याचा विक्रम केला आहे. यशस्वी जयस्वालच्या आधी हा विक्रम वीरेंद्र सेहवागच्या नावावर होता. वीरेंद्र सेहवागने २०१४ आयपीएल स्पर्धेत डावाच्या पहिल्या चेंडूवर चौकार मारण्याची किमया पाच वेळा केली होती. मात्र यशस्वी जयस्वालने हा विक्रम मोडीत काढला आहे.

यशस्वी जयस्वालने आयपीएल २०२३ मध्ये डावाच्या पहिल्या चेंडूवर पाचवेळा चौकार मारून वीरेंद्र सेहवागच्या विक्रमाशी बरोबरी केली. २०२५ मध्ये ही कामगिरी पुन्हा केली आहे. यावर्षी डावाची सुरुवात करणाऱ्या यशस्वी जयस्वालने पहिल्याच चेंडूवर पाचवेळा चौकार मारला आहे. दोन पर्वात डावाच्या पहिल्या चेंडूवर १० वेळा चौकार मारून आयपीएलच्या इतिहासात एक विशेष विक्रम प्रस्थापित केला आहे. या विक्रमासह, यशस्वी जयस्वालने यावेळी ५५९ धावा करून आपल्या आयपीएल मोहिमेचा शेवट केला.

मुंबई इंडियन्सची प्लेऑफमध्ये दमदार एन्ट्री

मुंबई, दि. २२ :

दिल्ली कॅपिटल्सवर ५९ धावांनी विजय

वानखेडे स्टेडियमवर बुधवारी खेळलेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सवर ५९ धावांनी मात करत मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२५ च्या प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित केले. सूर्यकुमार यादवच्या अर्धशतकी खेळी आणि बुमराह–सँटनर यांच्या भेदक माऱ्याच्या जोरावर मुंबईने हा निर्णायक विजय मिळवला.

प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने २० षटकांत ५ बाद १८० धावा केल्या. सूर्यकुमार यादवने केवळ ४३ चेंडूत नाबाद ७३ धावा करत संघाला मजबूत स्थितीत नेले. प्रत्युत्तरादाखल दिल्ली कॅपिटल्सची संपूर्ण संघफळी १८.२ षटकांत केवळ १२१ धावांत गारद झाली.

मुंबईच्या गोलंदाजीत मिचेल सँटनर आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी तीन गडी बाद करत सामन्याचे पारडे झुकवले. सँटनरने आपल्या ४ षटकांत केवळ ११ धावा देत ३ बळी घेतले, तर बुमराहने ३.२ षटकांत १२ धावांत ३ गडी बाद केले. या विजयासह मुंबई इंडियन्सने प्लेऑफमध्ये आपले स्थान पक्के केले, तर दिल्ली कॅपिटल्स स्पर्धेतून बाहेर पडली. सामन्यानंतरच्या सादरीकरणावेळी पावसाच्या सरी सुरु असताना सूर्यकुमार यादव छत्रीसह व्यासपीठावर दाखल झाला. त्याने छत्री थेट प्रेझेंटर हर्ष भोगले यांच्याकडे दिली. हा क्षण प्रेक्षकांच्या आणि चाहत्यांच्या मनात घर करून गेला. सूर्यकुमारला सामनावीर (प्लेअर ऑफ द मॅच) म्हणून गौरवण्यात आले.

सादरीकरणात बोलताना सूर्यकुमारने आपल्या पत्नी देविशा शेट्टीला हा पुरस्कार समर्पित करत म्हटले, आज १३ वा सामना होता. माझ्या पत्नीने आज मला सांगितले की तुला आई वगळता सगळे पुरस्कार मिळाले आहेत. हा विशेष सामना होता. संघासाठी महत्त्वाचा विजय आणि ही ट्रॉफी मी तिच्यासाठी समर्पित करतो.

त्याने पुढे सांगितले की , ती अशा क्षणांची वाट पाहत असते आणि आम्ही ते एकत्र साजरे करतो. शेवटपर्यंत फलंदाजी करत सामना जिंकण्यावर आमचा भर होता. आम्हाला माहित होतं की शेवटी एखादं मोठं षटक मिळू शकतं, त्यामुळे संयम ठेवून खेळणं गरजेचं होतं.

दरम्यान मुंबईने दिलेल्या १८१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवातच खराब झाली. नियमित कर्णधार अक्षर पटेलच्या अनुपस्थितीत खेळणाऱ्या दिल्लीसाठी समीर रिझवीने सर्वाधिक ३९ धावा केल्या, तर विप्रज निगमने २० आणि आशुतोष शर्माने १८ धावा करत थोडीफार झुंज दिली.

मुंबई इंडियन्सचा हा साखळी फेरीतील निर्णायक विजय ठरला असून, प्लेऑफपूर्वी संघाचा आत्मविश्वास कमालीचा उंचावला आहे.

धोनीने आता निवृत व्हावे – श्रीकांत

नवी दिल्ली, दि. २२ :

चेन्नई सुपर किंग्ज संघासाठी आयपीएल २०२५ हंगाम अत्यंत निराशाजनक ठरला आहे. नियमित कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या कोपराच्या दुखापतीमुळे हंगामाच्या मध्यभागी नेतृत्वाची धुरा पुन्हा एकदा माजी कर्णधार एमएस धोनीकडे देण्यात आली. मात्र, ५ वेळा आयपीएल जेतेपद पटकावणाऱ्या धोनीच्या नेतृत्वातही संघाला यश मिळविता आले नाही.

धोनीच्या नेतृत्वात सीएसकेने या हंगामात एकूण आठ सामने खेळले, मात्र त्यातील फक्त दोन सामन्यांतच विजय मिळवता आला. परिणामी, चेन्नई सुपर किंग्ज संघ आयपीएलच्या इतिहासात प्रथमच गुणतालिकेत सर्वात खालच्या स्थानावर राहिला.

धोनीची वैयक्तिक फलंदाजी कामगिरीही अपेक्षेप्रमाणे ठरली नाही. त्याने १३ सामन्यांमध्ये केवळ १९६ धावा केल्या असून, त्यातील सर्वोत्तम वैयक्तिक खेळी फक्त ३० धावांची आहे.

या पार्श्वभूमीवर माजी भारतीय क्रिकेटपटू आणि माजी सीएसके ब्रँड ॲम्बेसेडर कृष्णमचारी श्रीकांत यांनी धोनीच्या आयपीएलमधील भवितव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी आपल्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना म्हटले की, एमएस धोनी आता वयस्कर झाला आहे. त्यामुळे त्याच्याकडून फारशा अपेक्षा ठेवता येत नाहीत. पण जर तुम्ही काही ठोस कामगिरी करू शकत नसाल, तर स्पष्टपणे सांगावे आणि पुढे जावे.

नेहमीप्रमाणेच, धोनीने त्याच्या निवृत्तीबाबत निश्चित विधान केलेले नाही. एका अलीकडील मुलाखतीत तो म्हणाला, ही आयपीएल संपल्यावर पुढील ६ ते ८ महिने मला माझ्या शरीराची चाचणी घ्यावी लागेल. पाहावे लागेल की मी पुन्हा हे दबाव पेलू शकतो का.

आयपीएल २०२५ मध्ये आतापर्यंत १३ सामन्यांत फक्त तीन विजय नोंदवलेल्या सीएसकेचा अखेरचा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्सविरुद्ध होणार आहे. गुजरातने याआधीच प्लेऑफसाठी पात्रता मिळवलेली आहे.धोनीचा पुढील हंगामात सहभाग होणार की नाही, यावर अद्यापही अनिश्चिततेचे मळभ आहे. मात्र, यंदाच्या कामगिरीमुळे त्याच्यासह संघ व्यवस्थापनालाही आत्मपरीक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

आयुष म्हात्रे करणार भारतीय अंडर–१९ संघाचे नेतृत्व

मुंबई, दि. २२ :

मुंबईच्या संघातून आणि आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून चमकदार कामगिरी करत प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केलेल्या १७ वर्षीय आयुष म्हात्रे याच्याकडे भारतीय अंडर–१९ संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. हा संघ जून–जुलै २०२५ दरम्यान इंग्लंड दौऱ्यावर जाईल.

बिहारचा अवघा १४ वर्षीय सलामीवीर आणि राजस्थान रॉयल्सचा उदयोन्मुख फलंदाज वैभव सूर्यवंशी याचाही संघात समावेश करण्यात आला आहे. १६ सदस्यीय या संघात युवा आणि अनुभवी खेळाडूंची यशस्वी सांगड घालण्यात आली आहे.

या दौऱ्यात भारत अंडर–१९ संघ इंग्लंड अंडर–१९ संघाविरुद्ध एक ५० षटकांचा सराव सामना, पाच एकदिवसीय सामने आणि दोन बहुदिवसीय सामने खेळणार आहे. मुंबईचा यष्टीरक्षक अभिज्ञान कुंडू याला उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

पंजाबचा सलामीवीर विहान मल्होत्रा, ज्याने यापूर्वी सूर्यवंशीसोबत जोडीदारी केली आहे, तो देखील या संघाचा भाग आहे. याशिवाय सौराष्ट्रचा यष्टीरक्षक–फलंदाज हरवंश पंगालिया, बंगालचा वेगवान गोलंदाज युधाजित गुहा, केरळचा लेगस्पिनर मोहम्मद इनान आणि पंजाबचा ऑफस्पिनर अनमोलजीत सिंग यांनाही संधी देण्यात आली आहे.

ऑस्ट्रेलिया अंडर–१९ संघाविरुद्ध झालेल्या दोन युवा कसोटी सामन्यांत इनानने १६ बळी घेत सर्वाधिक यशस्वी गोलंदाज ठरला होता, तर अनमोलजीतने ९ बळी घेत दुसरे स्थान मिळवले होते. पंगालियाने या मालिकेत ११७ धावांचे शतक ठोकले होते.

गुजरातचा अष्टपैलू खिलन पटेल, ज्याला कूचबिहार ट्रॉफीमध्ये मालिकावीराचा किताब मिळाला होता, त्यालाही संघात स्थान मिळाले आहे.

संघातील अन्य खेळाडूंमध्ये मौल्यराजसिंह चावडा, राहुल कुमार, आर.एस. अम्ब्रीश, कनिष्क चौहान, हेनिल पटेल, प्रणव राघवेंद्र आणि आदित्य राणा यांचा समावेश आहे.

राखीव खेळाडू: नमन पुष्पक, डी. दीपेश, वेदांत त्रिवेदी, विकल्प तिवारी आणि यष्टीरक्षक अलंकृत रापोले यांची निवड करण्यात आली आहे. या संघाची निवड तिलक नायडू यांच्या अध्यक्षतेखालील बीसीसीआयच्या जूनियर सिलेक्शन कमिटीने केली आहे.

सामन्यांचे वेळापत्रक :

भारताचा ५० षटकांचा सराव सामना २४ जून रोजी लॉफबरो विद्यापीठात खेळला जाईल. पाच एकदिवसीय सामने २७ जून ते ७ जुलै दरम्यान होव्ह, नॉर्थम्प्टन आणि वॉर्सेस्टर येथे होणार आहेत.

बहुदिवसीय मालिकेतील पहिले सामन्याला १५ जुलै रोजी बेकेनहॅम येथे सुरुवात होईल, तर दुसरा सामना २० जुलैपासून चेम्सफोर्ड येथे खेळवण्यात येणार आहे.

या संघातील सर्व खेळाडू वयाच्या निकषानुसार २०२६ मध्ये झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे होणाऱ्या अंडर–१९ विश्वचषकासाठी पात्र ठरणार आहेत.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेनंतर आणि आशिया कपमध्ये उपविजेते ठरल्यानंतर भारतीय अंडर–१९ संघाचा हा तिसरा आंतरराष्ट्रीय दौरा असणार आहे.

भारत अंडर–१९ संपूर्ण संघ :

आयुष म्हात्रे (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, विहान मल्होत्रा, मौल्यराजसिंह चावडा, राहुल कुमार, अभिज्ञान कुंडू (उपकर्णधार), हरवंश पंगालिया (यष्टीरक्षक), आर.एस. अम्ब्रीश, कनिष्क चौहान, खिलन पटेल, हेनिल पटेल, युधाजित गुहा, प्रणव राघवेंद्र, मोहम्मद इनान, आदित्य राणा, अनमोलजीत सिंग.

फीफा विश्वचषक २०२५ : विशेष खेळाडू हस्तांतरण विंडो जाहीर

वृतसंस्था :(न्यूयॉर्क), दि. २२ :

फीफा क्लब विश्वचषक २०२५ स्पर्धेसाठी फुटबॉलच्या जागतिक प्रशासकीय संस्थेने १ जून ते १० जून दरम्यान एक विशेष खेळाडू हस्तांतरण (ट्रान्सफर) विंडो सुरू करण्याची घोषणा केली आहे. या काळात स्पर्धेत सहभागी होणाऱ्या क्लबना नवीन खेळाडूंशी करार करण्याची परवानगी देण्यात आली आहे. ही स्पर्धा १४ जून ते १३ जुलै २०२५ दरम्यान अमेरिकेच्या विविध शहरांमध्ये होणार आहे.

या स्पर्धेत जगभरातील सहा कॉन्फेडरेशन्समधून निवडलेले ३२ क्लब सहभागी होणार आहेत. या क्लब्सचा समावेश एकूण २० सदस्य संघटनांतून होतो. ब्राझीलने सर्वाधिक चार क्लब पाठवले असून, यजमान अमेरिका तीन क्लबसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.या स्पर्धेत अर्जेंटिना, ऑस्ट्रिया, ब्राझील, इजिप्त, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, कोरिया प्रजासत्ताक, मेक्सिको, मोरोक्को, न्यूझीलंड, पोर्तुगाल, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, स्पेन, ट्युनिशिया, संयुक्त अरब अमिराती आणि अमेरिका या देशांतील संघांचा सहभाग आहे.

इंग्लंडमध्ये नेहमीची समर ट्रान्सफर विंडो १६ जूनपासून उघडते. मात्र, क्लब वर्ल्ड कपमध्ये सहभागी असलेल्या चेल्सी आणि मँचेस्टर सिटीसाठी, तसेच इंग्लिश फुटबॉल असोसिएशनच्या सर्व संघांसाठी १ ते १० जूनदरम्यान ही अपवादात्मक ट्रान्सफर विंडो लागू असेल. या दरम्यान करारबद्ध खेळाडूंच्या संख्येवर कोणतीही मर्यादा नसणार आहे.

क्वार्टर फायनलपूर्वी, म्हणजे २७ जून ते ३ जुलै या काळात, प्रत्येक क्लबला दोन अतिरिक्त खेळाडू यादीत समाविष्ट करता येतील. ही भरती अंतिम यादीतील ३५ खेळाडूंपेक्षा वेगळी मोजली जाईल. मात्र, यादीतील एकूण बदलांची संख्या ६ च्या पुढे जाणार नाही. दुखापत किंवा आजारामुळे गोलकीपरची आवश्यक बदल संख्येत धरली जाणार नाही.३० जून २०२५ रोजी संपणारे करार फक्त त्या तारखेपर्यंत वैध मानले जातील. यानंतर करार संपल्यास संबंधित खेळाडू स्पर्धेत पुढे खेळू शकणार नाही.स्पर्धेच्या दरम्यान एखादा खेळाडू जर दुसऱ्या क्लबमध्ये सामील झाला, तर त्याला दुसऱ्या क्लबकडून प्रतिनिधित्व करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

फीफा वर्ल्ड कप २०२५ – मुख्य तपशील*

कालावधी: १४ जून ते १३ जुलै २०२५
संघ:३२
कॉन्फेडरेशन्स: ६
एकूण सामने:६३
स्थळे: १२
शहरे : ११ (अटलांटा, शार्लोट, सिनसिनाटी, लॉस एंजेलिस, मियामी, नॅशव्हिल, न्यू यॉर्क सिटी, न्यू जर्सी, ऑर्लँडो, फिलाडेल्फिया, सिएटल, वॉशिंग्टन डीसी)
उद्घाटन सामना: १४ जून, मियामी
अंतिम सामना: १३ जुलै, न्यू यॉर्क मेट्रोपॉलिटन एरिया

खेळाडूंची यादी – महत्त्वाच्या तारखा :

तात्पुरती यादी (१ जूनपूर्वी): – किमान २६ आणि कमाल ५० खेळाडू (किमान ४ गोलकीपर आवश्यक).
अंतिम यादी (१० जूनपर्यंत):– किमान २६ आणि कमाल ३५ खेळाडू (किमान ३ गोलकीपर आवश्यक).
फक्त नोंदणीकृत खेळाडूंनाच सामावून घेता येणार.
तात्पुरत्या यादीतील बदल १० जूनपर्यंत करता येतील.
हस्तांतरित खेळाडू तात्पुरत्या यादीत आधीपासून समाविष्ट असणे आवश्यक.

भारत– पाकिस्तान तणावामुळे नाहिद राणाची माघार

ढाका, दि. २२ :

बांगलादेशचा खेळाडू नाहिद राणा याने आगामी पाकिस्तान दौऱ्यातून माघार घेतली असून, तो दौऱ्यातून बाहेर पडलेल्या तीन खेळाडूंमध्ये एक आहे. हा दौरा पुढील आठवड्यात लाहोरमधील गद्दाफी स्टेडियमवर सुरू होणार आहे.

बांगलादेश क्रिकेट मंडळाच्या क्रिकेट ऑपरेशन्स विभागाचे अध्यक्ष नझमुल अबेदीन फहीम यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत–पाकिस्तानदरम्यान सुरू असलेल्या सीमावादामुळे पाकिस्तानात निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीचा नाहिदवर मानसिक परिणाम झाल्याने त्याने हा निर्णय घेतला असावा.

नाहिद राणा याने पाकिस्तान सुपर लीगमध्ये पेशावर झल्मी संघात खेळताना कठीण प्रसंगांचा सामना केला होता. त्यावेळीच त्याच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असावी, असेही फहीम यांनी सांगितले. त्याच संघात असलेला रिशाद हुसेन मात्र बांगलादेश संघासोबत पाकिस्तान दौऱ्यावर जाणार आहे.

फहीम पुढे म्हणाले की , नाहिद राणा आणि रिशाद हुसेन यांनी अलिकडच्या काळात जी परिस्थिती अनुभवली, ती खरोखरच धक्कादायक होती. अशा परिस्थितीत नाहिदने दौऱ्यातून माघार घेणे समजू शकते. आमच्या कोचिंग स्टाफमधील क्षेत्ररक्षण प्रशिक्षक जेम्स पॅमेंट आणि ट्रेनर नाथन केली हे देखील दौऱ्यावर जाणार नाहीत. मात्र उर्वरित सदस्य दौऱ्यासाठी तयार आहेत.

प्रारंभी काही खेळाडूंमध्ये पाकिस्तान दौऱ्याबाबत संकोच होता. मात्र, बहुतेक सहकाऱ्यांनी दौऱ्यात सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याने अन्य खेळाडूंनीही आपली भूमिका बदलली, अशी माहिती फहीम यांनी दिली.

पाकिस्तान दौऱ्याच्या वेळी तेथील यजमान मंडळ खेळाडूंना अत्यंत उच्च दर्जाची सुरक्षा पुरवते. चॅम्पियन्स ट्रॉफीदरम्यान मी स्वतः ती सुरक्षा पाहिली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनीही आम्हाला सर्वोच्च सुरक्षा देण्याचे आश्वासन दिले आहे, असे फहीम यांनी स्पष्ट केले.

बांगलादेशच्या या दौऱ्यात तीन सामन्यांची टी–२० मालिका खेळवली जाणार आहे. ही मालिका २८ मेपासून सुरू होणार असून, दुसरा सामना ३० मे रोजी आणि अंतिम सामना १ जून रोजी होईल. यापूर्वी नियोजित पाच सामन्यांच्या मालिकेऐवजी ही मालिका तीन सामन्यांचीच ठेवण्यात आली आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २६० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 260 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .